दूरध्वनी :२४४७६१३८,२४४७५५७१,२४४७८३२५
फॅक्स : ०२०-२४४७७०१०, २४४८१२६१
ई-मेल : dir.mscert@gmail.com
Website : www.mscert.org.in

ज्ञानसेवा तु साफल्यम्
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विदया परिषद)
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०

जा.क्र.मराशैंसप्रप/अविवि/शिप्र/२०१५-१६
दिनांक १६/३/२०१६

प्रति,

१) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, (सर्व)
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सर्व
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, सर्व
४) शिक्षण निरीक्षक ,(पश्चिम, दक्षिण, उत्तर )
५) शिक्षणप्रमुख /शिक्षण अधिकारी / प्रशासन अधिकारी महानगरपालिका

**विषयः- प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम -२०१२ इयत्ता ६ वी चे पाठ्यपुस्तक व अध्यापनशास्त्राच्या व्हर्च्युअल प्रशिक्षणाबाबत.**

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता संवर्धनासाठी अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. परिषदेच्या अभ्यासक्रम विकसन विभागामार्फत NCF-२००५, RTE-२००९ व SCF-२०१० नुसार राज्याचा प्रचलित अभ्यासक्रम पुनर्रचित करण्याचे काम पूर्ण झाले असून प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ -इ.१ ली ते ८ वी च्या अभ्यासक्रमास शासन निर्णय क्रमांक पीआरई-१४११/(१७५/११) प्राशि-५ दिनांक २८.१२.२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ ची अंमलबजावणी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून सन २०१५-१६ पर्यंत इयत्ता १ ली ते ५ वी पर्यंत टप्याटप्याने करण्यात आली आहे. सन २०१६-१७ शैक्षणिक वर्षात इयत्ता ६ वी पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

राज्यशासनाच्या सूचनेनुसार सन २०१६-१७ मध्ये इयत्ता ६ वी चे प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण व्हर्च्युअल क्लासरुम यंत्रणेच्या सहाय्याने घेण्याचे निश्चित केले आहे. सदर प्रशिक्षण सन २०१६-१७ मध्ये इयत्ता ६ वी च्या वर्गाला अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी आयोजित केलेले आहे. सन २०१६-१७ मध्ये होणारे प्रशिक्षण हे माध्यमनिहाय व विषयनिहाय होणार आहे.

**मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणाचे वेळापत्रक** खालीलप्रमाणे

| अ.क्र. | दिनांक | विषय | वेळ |
|---|---|---|---|
| १ | २५/४/२०१६ | मराठी (प्रथम भाषा ) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| २ | २६/४/२०१६ | हिंदी (द्वितीय भाषा ) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ३ | २७/४/२०१६ | इंग्रजी (तृतीय भाषा ) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ४ | २८/४/२०१६ | गणित | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ५ | २९/४/२०१६ | विज्ञान | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ६ | ३०/४/२०१६ | सामाजिकशास्त्रे | सकाळी १०.०० ते ३.०० |

**उर्दू व इंग्रजी माध्यमाच्या प्रशिक्षणाचे नियोजन पुढीलप्रमाणे**

| अ.क्र. | दिनांक | विषय | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ६/६/२०१६ | इंग्रजी (उर्दू माध्यम) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| २ | ७/६/२०१६ | इंग्रजी / उर्दू (प्रथम भाषा) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ३ | ८/६/२०१६ | हिंदी (द्वितीय भाषा ) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ४ | ९/६/२०१६ | मराठी (अनिवार्य ) | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ५ | १०/६/२०१६ | गणित | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ६ | ११/६/२०१६ | विज्ञान | सकाळी १०.०० ते ३.०० |
| ७ | १२/६/२०१६ | सामाजिक शास्त्रे | सकाळी १०.०० ते ३.०० |

उपरोक्त प्रशिक्षण व्हर्च्युअल पद्धतीने घेण्यासाठी राज्यातील यशदा, यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठ - नाशिक, A-View, या संस्थेच्या व्हर्च्युअल यंत्रणेचा वापर करण्यात येणार आहे.

प्रशिक्षण शैक्षणिकदृष्टया यशस्वी करण्याची जबाबदारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची राहील ,परंतु प्रशासकीय जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांची आहे. आपल्या जिल्हयातील इयत्ता ६ वी च्या प्रत्येक शिक्षकाचे प्रशिक्षण पूर्ण होणे गरजेचे आहे. उपरोक्त वेळापत्रकानुसार व्हर्च्युअल केंद्राच्या ठिकाणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक ) व त्यांचे अधिनस्थ अधिकारी (गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख) उपस्थित असणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे प्राचार्य (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) व त्यांचे जेष्ठ अधिव्याख्याता / अधिव्याख्याता / साधन व्यक्ती उपस्थित असणे आवश्यक आहे. माध्यमिक शाळांना संलग्न असणाऱ्या इयत्ता ६ वी च्या वर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील. इयत्ता ६ वी ला शिकविणारा एकही शिक्षक प्रशिक्षणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांनी घ्यावी.

**पर्यवेक्षकीय यंत्रणेची भूमिका**

**प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था**

१) प्रशिक्षणार्थी संख्येच्या प्रमाणात व्हर्च्युअल प्रशिक्षण केंद्रांची निर्मिती करणे.
२) व्हर्च्युअल प्रशिक्षण केंद्रामध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्ध करणे. (4Gचे इंटरनेट)
३) व्हर्च्युअल प्रशिक्षण केंद्रावर शैक्षणिक सुलभकांची नियुक्ती करणे.
४) शैक्षणिक सुलभकांचे जिल्हास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करणे.
५) आपल्या अधिनस्थ असणाऱ्या जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, साधनव्यक्ती यांचे सहकार्याने व्हर्च्युअल प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पाडावे.
६) प्रशिक्षणामध्ये पाठ्यपुस्तके केवळ शासकीय व अनुदानित शाळांच्या शिक्षकांनाच वितरीत करण्यात यावीत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**

१) व्हर्च्युअल सेंटर्स निर्मितीबाबत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेस प्रशासकीय सहकार्य करणे.
२) प्रशिक्षणासाठी शिक्षकांना वेळेवर कार्यमुक्त करणे व जवळच्या केंद्रावर प्रशिक्षणास हजर राहणेबाबत आदेश देणे.
३) प्रशिक्षणासाठी आवश्यक निधी तात्काळ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे वर्ग करणे.
४) आपल्या अधिनिस्थ असणाऱ्या सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांना प्रशिक्षण योग्य रितीने पार पाडण्याबाबत आदेश निर्गमित करणे.
५) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई यांचे मान्यतेने इयत्ता ६ वी चे पाठ्यपुस्तक विषय निहाय प्रत्येक प्रशिक्षणार्थीस देणे.
६) मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमाचे प्रशिक्षण विनाअनुदानीत शाळांच्या शिक्षकांना देण्यात यावे यासाठी कोणताही निधी देय नाही.

७) अन्य माध्यमाच्या शाळांनी प्रथम भाषा सोडून इतर विषयाचे प्रशिक्षण इंग्रजी, उर्दू अथवा मराठी माध्यमाच्या प्रशिक्षणामध्ये घेण्यात यावे. याबाबत स्वतंत्र आदेश आपल्या स्तरावरुन निर्गमित करण्यात यावे.

८) प्रशिक्षणासाठी आवश्यक पाठ्यपुस्तके बालभारती यांच्याकडून प्राप्त करुन प्रशिक्षण केंद्रापर्यंत वितरीत करण्यात यावीत.

**शिक्षणाधिकारी (माध्यमिक )**

१) तंत्रज्ञानाच्या सोयी सुविधा असणाऱ्या माध्यमिक शाळा, व्हर्च्युअल केंद्र म्हणून उपलब्ध करुन दयाव्यात.

२) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रशिक्षाणाला पूर्ण सहाय्य करणेबाबत आपल्या स्तरावरुन स्वतंत्र आदेशान्वये सूचित करण्यात यावे.

३) प्रशिक्षणासाठी ६ वी च्या शिक्षकांना कार्यमुक्त करणे व जवळच्या केंद्रावर प्रशिक्षणास हजर राहणेबाबत आदेश देणे.

४) आपल्या अधिनिस्थ असणाऱ्या सर्व उपशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी यांना पूर्णवेळ प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्यासाठीचे नियोजन करुन दयावे व संबंधित अधिकारी प्रशिक्षण स्थळी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनीही प्रशिक्षण स्थळी उपस्थित रहावे.

याबाबच्या सूचना शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक ) यांनी गटशिक्षणाधिकारी , विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांना आपल्या स्तरावरुन दयाव्यात. तर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता यांना सूचना दयाव्यात प्रशिक्षणासाठी आवश्यक निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या कडून आपल्या सर्व शिक्षा अभियानाच्या स्वतंत्र खात्यावर जमा होणार आहे. संबंधित प्रशिक्षणासाठी सदर निधी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला वितरीत करावा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) यांनी आपल्या अधिनस्त असणाऱ्या सर्व गटशिक्षणाधिकरी , विस्तार अधिकारी , केंद्रप्रमुख यांना प्रशिक्षण योग्य व प्रभावी रितीने पार पाडणे बाबत आदेश आपल्या स्तरावरुन निर्गमित करावे.

२१/६/१६

(गोविंद नांदेडे)
**संचालक,**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व**
**प्रशिक्षण परिषद,(विद्यापरिषद) पुणे ३०**

**प्रतः माहितीस्तव सादर,**

१) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२) मा. आयुक्त, शिक्षण , महाराष्ट्र राज्य
३) मा.राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प., चर्नीरोड, मुंबई-४
४) संचालक, (प्राथमिक ) शिक्षण संचालनालय, पुणे
५) संचालक, (माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे
6) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)